संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रुपये अहिल्यानगर, बुधवार दि. १७.०६.२०२६ अंक नं. ०६६ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

## स्मृतीगंध



**स्व. शांतीलालजी नेमिचंदजी मुनोत**

स्व. दि. १७/६/२०१०

सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा
आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा
आजही दरवळत आहे...

*आपल्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली !*

● शोकाकुल ●

**केशरगुलाब मुनोत परिवार (नेवासकर)**
**मुनोत ग्रुप ऑफ कंपनीज्**
अहिल्यानगर

**स्कूल बॅग्ज्**

भरपूर व्हरायटीज
रिजनेबल रेट



* रु.२०० पासून रु.१५०० पर्यंत
* रु. १००० पुढील किंमतीचे स्कूल बॅगवर ३० ते ५० टक्केपर्यंत सूट तसेच दै. नवा मराठातील या जाहिरातीचे कात्रण किंवा फोटो घेऊन येणारास अजून रु.१०० सूट
* टिफीन बॅग, स्कूल पाऊच उपलब्ध.

वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल

**मयुरी लेडिज मॉल**

म्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188



# गुरु पुष्य

शुभमुहूर्त गुरूपुष्यामृतचा..
योग सुवर्णालंकार खरेदीचा..

विविध आकर्षक योजनांद्वारे
सोने-हिऱ्यांचे दागिने खरेदीची संधी..



१९४६ पासून कलात्मक सोन्याच्या दागिन्यांची
विश्वसनीय परंपरा जपणारी नगरमधील नामांकित पेढी

**सहदेव ज्वेलर्स**
(राहुरीकर)

भिस्तबाग चौक, रोनक सेंटरच्या शेजारी, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर
फोन : (0241) 2355474, मो. 9767355474.

BIS प्रमाणित सोन्याचे हॉलमार्क दागिने

सर्वात कमी दरात व मजुरीमध्ये..

"शुन्यातुन
विश्व निर्माण करणारे
**एक उत्साही** व
**कर्तृत्वसंपन्न**
व्यक्तिमत्व"

श्रध्दांजली



**स्व.श्री. रसिकलालजी चंदुलालजी कोठारी**

(स्वर्गवास : रविवार १८ जून २०२३)

आपला जीवनप्रवास
आम्हांस सदैव प्रेरणा देत राहील.

तृतीय पुण्यस्मरणदिनी आपल्या स्मृतिस विनम्र अभिवादन.

- दुःखांकित -

**समस्त कोठारी परिवार**

अहिल्यानगर । जामखेड

Nirmal

९ वे

# पुण्यस्मरण



श्रध्दांजली

आमच्या आशा आमचे जीवन,
मुंतून राहील तव चरणाशी..
उच्च विचारसरणी अन् खुली प्रेरणा,
आपली सदैव साथ आमच्या पाठीशी..
आपली तेजोमय आठवण जीवन मार्गावर,
सदैव आमच्या सोबत आहे...

**वै. लक्ष्मणराव चुडाजी कोतकर**

स्वर्गवास दि. १७/६/२०१७

आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली!

।। दुःखांकित ।।

सौ. भिमाबाई रंगनाथ जपकर
सौ. कुसुमबाई बाबासाहेब शिंदे
सौ. शांताबाई पंढरीनाथ जपकर
श्री. अशोक लक्ष्मण कोतकर
सौ. रंजनाबाई सुभाष डोंगरे
सौ. रोहिणी संतोष उरमुडे
सौ. सुवर्णा प्रभाकर घोडके
श्री. मच्छिंद्र लक्ष्मण कोतकर
श्री. जालिंदर लक्ष्मण कोतकर (नगरसेवक, मनपा अहिल्यानगर)

**समस्त कोतकर परिवार व केडगांव ग्रामस्थ,** अहिल्यानगर

NISHA GROUP

भैरवनाथ उद्योग समूह, घोसपुरी.
हॉटेल निशा पॅलेस, केडगांव.
निशा लॉन, केडगांव. मो. ९८५०४८९९९९
निशा इन्फ्रास्ट्रक्चर (आरएमसी)
केडगाव, अहिल्यानगर

# गृहिणी

## आरोग्य

### व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता दूर करायची आहे?

आपल्यापैकी बरेच जण व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेची तक्रार करतात, बी१२ ची कमतरता. आपल्यापैकी बरेच जण या कम तरतेमुळे त्रस्त आहेत. थकवा, अशक्तपणा, केस गळणे, मनःस्थितीत होणारे बदल आणि वारंवार आजारी पडणे या गोष्टी आजकाल सामान्य झाल्या आहेत. बरेच जण आराम मिळवण्यासाठी सप्लिमेंट्सचा आधार घेतात. एक असा सुपरफूड आहे जो या समस्येवर लक्षणीयरीत्या उपाय करू शकतो. ती आहे शेवग्याची पाने बी१२ जीवनसत्त्वाच्या कमतरतेवर एक नैसर्गिक उपाय आहेत. फक्त वाळलेली शेवग्याची पाने रोजच्या आहारात, जसे की डाळ, ब्रेड, भाज्या किंवा पिठात मिसळा आणि तुम्हाला फक्त दोन महिन्यांतच लक्षणीय बदल दिसून येतील. याचे सेवन करणेही खूप सोपे आहे. तुम्ही ते पावडरच्या स्वरूपात घेऊ शकता, जी बाजारात सहज उपलब्ध असते. रोज एक चमचा ही पावडर पिठात मिसळून पोळ्या बनवा, किंवा डाळ, भात किंवा भाजीमध्ये घाला. जर झाड जवळ असेल, तर ताजी पाने उकळून भाजीमध्ये वापरा. तुमची इच्छा असल्यास, ते दह्यामध्ये मिसळून सकाळी रिकाम्या पोटी खा. याव्यतिरिक्त, जर तुम्हाला बी१२ ची पातळी सामान्य ठेवायची असेल, तर तुमच्या सिडिटीवर नेहमी लक्ष ठेवा आणि अँटासिडचे सेवन कमी करा. आरओ पाण्याऐवजी चांगल्या प्रकारे गाळलेले पाणी वापरा. गरज भासल्यास, मिथाइलकोबालामिन सप्लिमेंट्ससाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. दररोज सकाळी १०–१५ मिनिटे सूर्यप्रकाश घ्या.

## पाककला

### आईस्क्रीम पाणीपुरी

**साहित्य :** पाणीपुरीच्या पुऱ्या २० नग, व्हॅनिला आईस्क्रीम ५०० मिली, चॉकलेट आईस्क्रीम २०० मिली, चॉकलेट सॉस ४ चमचे, स्ट्रॉबेरी सिरप २ चमचे, मिक्स फ्रुट केळं, द्राक्ष, डाळिंब बारीक चिरलेले, रंगीत जेम्स मूठभर, ड्राय फ्रुट काप काजू, बदाम, पिस्ता, चेरी सजावटीसाठी

**कृती :** पुरी वरून हलकी फोडून घ्या. मऊ केलेलं व्हॅनिला आईस्क्रीम पुरीत ७०% भरा. वरून फ्रुटचे तुकडे टाका. चॉकलेट सॉस आणि स्ट्रॉबेरी सिरप टाका. जेम्स आणि ड्रायफ्रुट भुरभुरा. चेरी लावून लगेच सर्व्ह करा.

## वास्तू

### किचन आणि देवघर

✻ किचनमध्ये देवघर किंवा मंदिर अजिबात ठेवू नये.

✻ कचऱ्याची बादली दक्षिण किंवा नैऋत्य कोपऱ्यात ठेवावी आणि ती नेहमी झाकून ठेवावी. ईशान्य दिशेला कचरा ठेवल्यास घरात आजारपण येतं.

✻ पिण्याच्या पाण्याचा माठ किंवा फिल्टर मात्र ईशान्य दिशेला ठेवावा. किचनमध्ये पूर्व दिशेला खिडकी असणं शुभ मानलं जातं आणि धूर बाहेर जाण्यासाठी एक्झॉस्ट फॅन पूर्व किंवा दक्षिण भिंतीवर लावावा. ल

✻ लक्षात ठेवा की किचनमध्ये आरसा लावू नये, विशेषतः शेगडीसमोर. शेगडीचं प्रतिबिंब आरशात दिसणं अशुभ मानलं जातं.

## सौंदर्य

✻ साबणातून स्पुली ब्रश फिरवून भुवया वरच्या दिशेने ब्रश करा – Soap Brows लुक मिळतो. कन्सीलरने भुवईच्या खाली हायलाईट केलं तर लिफ्टेड दिसतात.

✻ आयब्रो पेन्सिल केसांच्या रंगापेक्षा एक शेड लाईट घ्या. छोट्या स्ट्रोकने गॅप भरा. शेवटी स्पुली ब्रशने ब्लेंड करा. आयब्रो जेल लावलं तर सेट राहतात.

## सल्ला

✻ टूथपेस्ट आणि जुना ब्रश घ्या. भांड्यावर घासून कोमट पाण्याने धुवा. सोन्यासारखी चमक येईल.

✻ एका वाटीत खायचा सोडा किंवा कॉफी पावडर ठेवून फ्रीजमध्ये ठेवा. २४ तासात फ्रिजचा सगळा वास शोषून घेतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १८ जून २०२६

**विनायक चतुर्थी, गुरुपुष्यामृत, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, पुष्य ११|३३, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** नवीन संधी मिळतील, अचानक खर्च वाढेल, जोडीदारासोबत वेळ जाईल.

**वृषभ :** रखडलेली कामे पूर्ण होतील, धनलाभ होईल, जुना मित्र भेटेल.

**मिथुन :** प्रवासाचे योग आहेत, नवीन लोक भेटतील, प्रेमात गैरसमज होईल.

**कर्क :** कुटुंबासाठी दिवस जाईल, घरखर्च वाढेल, घरात शुभ काम घडेल.

**सिंह :** तुमचं म्हणणं लोक ऐकतील, अडकलेले पैसे परत मिळतील, मुलांकडून आनंदाची बातमी येईल.

**कन्या :** बारीकसारीक कामात दिवस जाईल, बचत वाढेल, तब्येतीची तक्रार जाणवेल.

**तूळ :** भागीदारीत फायदा होईल, नवीन करार जमेल, दिवस रोमँटिक जाईल.

**वृश्चिक :** गुप्त शत्रू त्रास देतील, कोर्टाची कामे लांबणीवर पडतील, भावनिक व्हाल.

**धनु :** शिक्षणात यश मिळेल, लांबच्या प्रवासातून फायदा होईल, वडीलधाऱ्यांची भेट होईल.

**मकर :** मेहनतीचं फळ मिळेल, प्रमोशनची शक्यता आहे.

**कुंभ :** नवीन कल्पना सुचतील, तांत्रिक कामात फायदा होईल.

**मीन :** कलाक्षेत्रात झएआनंदासाठी खर्च होईल, भावनिक निर्णय घ्याल.

## शब्दगंध क्र. ७४५४ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** १) एक तंतुवाद्य; तंबोरा ४) कापड; वस्त्र ६) राज्यासंबंधीचे प्रश्न किंवा गुप्त मसलत ८) सद्वर्तन; उदारता; शील १०) रस्ता; मार्ग; पथ १२) वंदन; सुरुवात; प्रणाम; आरंभ १३) शेपटी असलेला काळ्या तोंडाचा एक प्राणी १४) एक समसंख्या; शास्त्रांची संख्या १५) शरीरातील त्रिदोषांपैकी एक; खोकला १६) मुस्लीम वर्षाचा पहिला महिना १८) मोठी टोपली १९) कामबंद आंदोलन; हरताळ २१) एक प्रकारची दारू २२) चलाख; हुशार; ताजातवाना

**उभे शब्द :–** १) खिडक्या वगैरेंना लावण्यात येणारी काच २) जुना; प्राचीन ३) राजेश खन्नाचा सुरुवातीच्या काळातील एक हिंदी चित्रपट ४) हार; सारा; हस्त; महसूल ५) एक चर्मवाद्य; पखवाज ७) कपट; कारस्थान; कट ९) राजेश खाल्लूया मिठाला न जागणारा; खन्ना, अमिताभ बच्चन यांचा एक हिंदी चित्रपट ११) कवच; आवरण; साल १४) समज; मनाचा ग्रह १६) आम्रवृक्षाची मंजरी; छाप; शिक्का १७) आवडलेला; मान्य झालेला २०) पंख असलेली गोष्टीतील स्त्री

### शब्दगंध क्र. ७४५३ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** मन शांत असेल तर प्रत्येक संकट छोटं वाटतं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### गरम चहात बिस्कीट बुडवल्यावर मऊ का होतं?

आपण सगळेच चहासोबत बिस्कीट खातो आणि गरम चहात बुडवलेलं बिस्कीट तोंडात टाकताच विरघळतं. पण हे बिस्कीट मऊ का होतं यामागे एक सोपं विज्ञान आहे. बिस्कीट हे मुख्यतः मैदा, साखर, तेल किंवा तूप आणि थोडंसं पाणी एकत्र करून भाजून तयार केलं जातं. भाजण्याच्या प्रक्रियेत बिस्किटातील सर्व पाणी उडून जातं, त्यामुळे त्यात असंख्य सूक्ष्म हवेच्या पोकळ्या तयार होतात. याच पोकळ्यांमुळे बिस्कीट कुरकुरीत आणि हलकं लागतं. जेव्हा आपण हे कोरडं, कडक बिस्कीट ७०–८० अंश सेल्सिअस तापमानाच्या गरम चहात बुडवतो, तेव्हा 'केशाकर्षण' नावाची क्रिया घडते. टिश्यू पेपर पाणी कसा शोषून घेतो तसंच चहा बिस्किटाच्या सूक्ष्म छिद्रांमधून आत शिरतो. गरम चहा मिळताच बिस्किटातील स्टार्चचे कण पाणी शोषून फुगायला लागतात. या प्रक्रियेला 'जिलेटिनायझेशन' म्हणतात. त्यामुळे बिस्किटाची कडक रचना सैल पडते. त्याचबरोबर बिस्किटातील साखर गरम चहात झटकन विरघळते. साखर हा बिस्किटाला बांधून ठेवणारा एक महत्त्वाचा घटक असतो, तो निघून गेल्यावर बिस्कीट आणखी ठिसूळ होतं. बिस्किटातील फॅट म्हणजे तूप किंवा डालडा देखील उष्णतेमुळे वितळतं. मैद्यात असलेलं ग्लूटेन प्रोटीनही पाणी शोषून मऊ आणि लवचिक बनतं. कोरडं असताना हेच ग्लूटेन बिस्किटाला कडकपणा देतं.

थोडक्यात या संपूर्ण प्रक्रियेला 'हायड्रेशन' म्हणतात, म्हणजेच कोरड्या पदार्थाने पाणी शोषून घेणे. गरम पाण्याचे रेणू थंड पाण्यापेक्षा जास्त वेगाने हालचाल करतात, म्हणून गरम चहात बिस्कीट २–३ सेकंदात मऊ पडतं. थंड दुधात हेच बिस्कीट मऊ व्हायला वेळ लागतो. म्हणूनच पार्ले–जी सारखी जास्त साखर असलेली बिस्किटं चहात टाकताच विरघळतात, तर जाड क्रीम बिस्किटं थोडा वेळ टिकतात. मऊ झालेलं बिस्कीट चहाची चव शोषून घेतं, म्हणून ते खायला अधिक चविष्ट लागतं.

### वेळेची किंमत

जुन्या काळात एक राजा होता. त्याला शिकारीचा खूप नाद होता. एकदा तो जंगलात शिकार करताना आपल्या सैन्यापासून दुरावला. तहान लागली म्हणून तो एका झाडाखाली बसला. तेवढ्यात तिथे एक म्हातारा लाकूडतोड्या लाकडं तोडत होता. राजाने त्याला पाणी मागितलं. म्हाताऱ्याने कमंडलूतलं थंडगार पाणी दिलं. राजा तृप्त झाला. त्याने विचारलं, बाबा, या वयातही एवढं कष्ट करता? आराम करा. म्हातारा हसला आणि म्हणाला, महाराज, मी आंब्याची झाडं लावतोय. राजाला आश्चर्य वाटलं.

तो म्हणाला, आहो, या झाडांना फळं यायला दहा वर्षे लागतील. तुम्ही तोपर्यंत जगाल का?

म्हातारा उत्तरला,

महाराज, माझ्या आजोबांनी झाडं लावली म्हणून मी आज आंबे खातो. मी लावलेल्या झाडांची फळं माझी नातवंडं खातील. मी आज वेळ वाया घालवली तर त्यांना सावलीही मिळणार नाही. प्रत्येक क्षणाचं मोल आहे. हे ऐकून राजाला आपली चूक उमगली.

तो राजवाड्यात परत आला आणि शिकारीचा नाद सोडून राज्यकारभारात लक्ष घालू लागला. प्रजेच्या भल्यासाठी त्याने कालवे बांधले, शाळा काढल्या. त्याच्या एका निर्णयामुळे पुढच्या अनेक पिढ्यांचं भलं झालं.

**तात्पर्य :** आपण आज केलेला वेळेचा योग्य वापर उद्याचं भविष्य घडवतो. वेळ वाया घालवणं म्हणजे स्वतःच्या पुढच्या पिढीचं नुकसान करणं.

## आत्मशक्ति



इंद्रियांच्या स्वाधीन असलेल्या खोट्या सोबतीला, बंधनाला जो सोडतो तो विवेकशीलह्या जागृत माणसांनी आत्मा, परमात्म्याबाबत काय शोधून काढले मात्मा आपोआप स्वतःच ब्रह्मांडाचे स्वरुप जाणतो! आणि शरीर सोडल्यानंतरही आहे ? आत्मा, परमात्मा एकच आहेत, हे सूफी संतांनी शोधून काढले आहे. आत्मा भमर राहतो.

हा परमात्म्याचेच रूप आहे असे त्यांना दिसले. हा आत्मा ज्या अथांग महासागराचा गुरु ग्रंथ साहेबांत लिहिलेले आहे,

एक थेंब आहे त्यास परमात्मा म्हणतात. आत्मा, परमात्म्याच्या एकरुपतेबद्दल सर्व धर्मात एकमत आहे. बायबलमध्ये म्हटले आहे की,

मग परमेश्वराने म्हटले की, आपल्या स्वरुपाप्रमाणे माणसाचे रुप बनवू या! (उत्पत्ती १:२६) बौध्द धर्मात परमात्मा शब्दाचा उल्लेख येत नाही, परंतु तेथे

### देहबुद्धी

बुध्दाची प्रकृति असे वर्णन येते.

(केन उपनिषद १–१–२)

आत्मा पारब्रम्ह का रुपु.

(गौंड, महालड, पृ. ४७४)

पुस्तकी ज्ञान हे आंतरिक अमर्यादित ज्ञानाकडे फक्त निर्देश करते. इतिहास फक्त पुस्तकी ज्ञान किंवा सिध्दान्त विषयक गोष्टींची माहिती देते. यावरून आम्हाला फक्त एवढेच समजते की, आम्ही आत्म्याचा शोध कोठे घ्यावा ? रिंतु हे ज्ञान आमचा आत्मा जागृत करण्यासाठी उपयोगी पडत नाही. धर्मग्रंथ आम्हाला काय सांगताहेत, ते त्यातूनच वाचून आम्हाला कळेल. परंतु जोपर्यंत आम्ही अंतर्मुख ऊन देहबुद्धीच्या वर येऊन परमेश्वर दर्शनाचा लाभ घेत नाही, तोपर्यंत ह्या धर्मग्रंथातील मार्गदर्शन, सत्य स्वरुपात स्पष्ट व प्रमाणभूत सिध्द होत नाहीत. सिध्दांत स्पष्ट करणारे बाह्यज्ञान फक्त दुसऱ्याला शिकविले जाऊ शकते, पण प्रत्यक्ष व्यवहारात खरेखुरे (कुराण १५–२९) ज्ञान स्वतः च्या अनुभवांतून मिळते, केवळ लिहिण्या–वाचण्याने मिळत नाही.

भगवद्गीतेत म्हटले आहे की, सदैव आत्म संशोधन हे खरेखुरे ज्ञान असते. अन्य काही शोधणे अज्ञान होय. चिनी बौध्द धर्म, ताओझम मध्ये सांगितले आहे. अधिक लिहिण्यावाचण्यांतून मिळणारे ज्ञान, खऱ्याखुऱ्या ज्ञानाहून वेगळे असते. हे उपरे ज्ञान होय. काही विभूतींनी आत्मा आणि परमात्म्यास जाणले आहे, हे तथ्य आम्हास आत्मानुभव करवू शकत नाही. पण एवढे मात्र खरे की, आमचे ध्येय प्राप्त करण्यासाठी ते मार्गदर्शक ठरते व आम्हाला तशी प्रेरणा देते. जे कार्य दुसऱ्यांनी केले ते आम्हीही करू शकतो. आम्ही चंद्रावर पाऊल टाकले आहे. आजकाल शास्त्रज्ञ अशा अवकाश भरारीची योजना बनवित आहेत की जेणेकरून त्याहीपुढे इतर ग्रहांवर जाणे माणसाला शक्य व्हावे!

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सोप्या गोष्टी जटिल होतात आणि त्या सुधारण्यासाठी आपल्याला जास्त ऊर्जा खर्च करावी लागते.

कृती करायची वेळ येताच मन दोन विचार निर्माण करतं. जणू दोन थर, स्तर एकमेकांशी बाद घालत आहेत. त्या वेळी न्यायाधीशाला स्थिर राहावंच लागतं. हे स्तर म्हणजे आपले दोन विचार आहेत जे एकमेकांच्या संपूर्ण विरुद्ध असू शकतात. मन विचार करेल की, मी हे करू की नको? तर बुद्धी न्यायाधीश बनून काय करायचं आहे हे ठरवेल. म्हणूनच पहिला स्तर किंवा पहिला विचार म्हणतो – मी ह्या व्यक्तीशी का बोलायचं? त्या वेळी दुसऱ्या स्तराने असा प्रतिसाद दिला पाहिजे की, यासाठी बोलायचं कारण ते माझ्याच फायद्याचं आहे. असं केल्याने माझ्या ऊर्जेचा प्रवाह अधिक चांगला होईल, माझे नकारात्मक विचार आधीपेक्षा कमी होतील. मला चांगलं बाटेल, माझं सामर्थ्य वाढेल. आपण आपला अहंकार जेवढा बाजूला ठेवू तेवढं आपल्या आत्म्याचं सामर्थ्य वाढेल आणि आपण विजयी होऊ याउलट, आपण आपल्या अहंकाराला जितक्या वेळा विजयी होऊ देऊ, तितक्या बेगाने आपण कमकुवत होऊ.

### संतांचे संस्कार

सुरेश ओबेरॉय लहान असताना आपण बुडणाऱ्या खेकड्याची गोष्ट ऐकली आहे. एका संतांनी त्या खेकड्याला बुडण्यापासून वाचवलं पण त्या खेकड्याने संतांना डंख मारला. कोणीतरी संतांना विचारलं, त्या खेकड्याने अनेकदा डंख मारूनही तुम्ही त्याला का वाचवलं ?

शिवानीदीदी : संतांनी उत्तर दिलं, खेकड्याने त्याचा डंख मारण्याचा संस्कार सोडला नाही तर ते त्यांचा इतरांना वाचवण्याचा संस्कार कसा सोडतील?

इतरांच्या वागण्याने जर आपण आपले मूळ संस्कार सोडून द्यायला लागलो तर यामुळे कोणाचं नुकसान होईल? समजा आपल्या सोयीसुविधांच्या पलीकडे जाऊन गरजूंना मदत करायला तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही हा गुण जपायलाच पाहिजे. भलेही तुम्ही दयाळू असूनही इतर लोक तुम्हाला सहकार्य करत नसतील तर तुम्ही स्वतःला सांगायला हवं की – मी मदत केली कारण हा माझा गुण आहे. आपण सगळे अद्वितीय आत्मा आहोत हे जेव्हा आपण समजून घेतो तेव्हा आपल्याला या गोष्टीची जाणीव होते की, इतरांकडे आपल्यासारखे गुण नसतील किंवा आपल्यात इतरांसारखे गुण नसतील. ते त्यांच्या संस्कारांप्रमाणे वागतील आणि आपण आपल्या संस्कारांप्रमाणे, इतरांची नक्कल करताना मोठी अडचण म्हणजे, दुसऱ्यांमध्ये आपल्यासारखे गुण नाहीत हे आपण पाहतो आणि लगेच आपणही आपल्या गुणांना किंवा गुणधर्मांना सोडून देतो.

समजा, वेळ पाळणं हा तुमचा संस्कार आहे, पण दुसरी व्यक्ती उशिरा येते. यावर तुम्ही असा विचार करू शकता की, वेळ पाळण्याचा काय फायदा ? दुसऱ्या

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सून : आई, आज पोळी कशी झाली?
सासू : अगं गुगल मॅपसारखी!
सून : म्हणजे?
सासू : कधी कुठे वळेल सांगता येत नाही!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ 'युनेस्को' चे मुख्यालय कोठे आहे?

– पॅरिस (फ्रान्स)

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

पडवळ ही फळभाजी संपूर्ण भारतात आढळते. त्यामध्ये दक्षिण भारतात फारच लोकप्रिय आहे. पडवळाचा वेल वर्षायू व भरभर वाढणारा असतो. पडवळाचा वेल हा सहसा उष्ण हवेत वाढतो.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : पडवळ हे शीतल, रेचक, सारक, कृमीनाशक आणि वांतीकारक आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, रिबोफ्लेविन, थायमिन, कॅरोटीन, नायसिन, प्रथिने, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, स्निग्धता हे सर्व पोषक घटक पडवळात असतात.

उपयोग :

### पडवळ

१) पित्तप्रकोपाने ताप आल्यास पडवळाचा काढा घ्यावा. पडवळ हे रेचक गुणधर्माचे असल्याने पोट साफ होऊन ताप उतरतो. ताप अधिक प्रमाणात असल्यास या काढ्यात कोथिंबीर, काडेचिराईताचा रस व मध घालून प्यावा.

२) पडवळामध्ये कमी उष्मांक असल्यामुळे हृदयरोग, मधुमेह या आजारावर ते उत्तम प्रकारचे टॉनिक होतो व आहे. या आजारामध्ये पडवळ नियमित खाल्लूयामुळे रसरक्तवाहिन्यांमधील अडथळा दूर रक्तपुरवठा सुरळीत होऊन वरील आजार कमी होतात.

३) लठ्ठपणा असणाऱ्या व्यक्तींनी वजन कमी करण्यासाठी आहारामध्ये नियमितपणे पडवळाचा वापर करावा.

४) छातीत धडधडणे, दुखणे, चमका मारणे इत्यादी तक्रारींवर पडवळाचा रस दिवसातून तीन वेळा दोन चमचे घ्यावा.

५) पडवळ कृमीनाशक असल्यामुळे पोटातील कृमी शौचावाटे पडून जाण्यासाठी पडवळाच्या बियांची पूड एक–एक चमचा दोन वेळा घ्यावी.

६) अपचन, पोटात गुबारा धरणे, शौचास साफ न होणे, या तक्रारींवर पडवळाच्या बियांची पूड एक– एक चमचा दोन वेळा घ्यावी. यामुळे पोटातील गुबारा कमी होऊन शौचास साफ होते.

७) सांधे सुजून दुखत असतील, तर अशा वेळी पडवळाच्या पानांचा रस कोमट करून सांध्याच्या ठिकाणी लावावा. साध्यांची सूज कमी होते.

८) पडवळाचे मूळ हे रेचक गुणधर्माचे असल्यामुळे अनेक प्रकारच्या त्वचाविकारांवर ते चांगल्या प्रकारे परिणाम करते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# पुणे येथून बुक केलेल्या कारचालकाला बंदुकीच्या धाकाने लुटणारी टोळी जेरबंद

### युट्यूबच्या क्लृप्तीचा वापर करून उबर चालकाची लूट; तिघे अटकेत, मुद्देमाल हस्तगत; नगर पोलिसांची कारवाई

नगर – झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी युट्यूबवरील क्लृप्ती पाहून उबर ॲपद्वारे गाडी बुक करून चालकाला लुटणाऱ्या टोळीला एमआयडीसी. पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. १३ जून रोजी ११:४७ वाजण्याच्या सुमारास, आरोपींनी ऑनलाइन उबर ॲपवरून पुण्याच्या वाकडेवाडी एस.टी. स्टँड ते माळेवाडी (ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) असे भाडे घेतले. त्यानंतर १४ जून रोजी पहाटे ३:४० वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगरमधील हॉटेल रिलॅक्स, खोसपुरी शिवाराजवळ लघवीसाठी गाडी थांबवण्यास सांगितले. तेथे गाडीतील तीन इसमांनी चालकाच्या डोक्याला बंदूक लावून, त्याचे हात बांधले आणि डोक्यात टणक वस्तू मारली. बंदुकीचा धाक दाखवून चालकाला गाडीखाली ढकलून देऊन, त्याच्याकडील रोख रक्कम, सोन्याची अंगठी आणि स्विफ्ट डिझायर गाडी असा एकूण ५,७०,५०० रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून हे आरोपी पळून गेले होते. याप्रकरणी फिर्यादी विशाल सूर्यकांत कट्टीमणी यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४) आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पुणे येथून बुक केलेल्या कारचालकाला बंदुकीचा धाक दाखवून लुटणारी टोळी जेरबंद केल्यानंतर त्यांच्यासमवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि. हेमंत थोरात यांना तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले. प्रभारी अधिकारी हेमंत थोरात यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण आणि व्यापक मोहीम राबवून या गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान विशाल सोमनाथ तांगडे (वय १९), तुळशीराम उर्फ राम पंढरीनाथ चव्हाण (वय २१) आणि कल्याण उर्फ बबलू रामेश्वर गायकवाड (वय १९) हे तिन्ही आरोपी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील आनंदवाडी येथील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एमआयडीसी पोलीस पथकाने गेवराईत जाऊन सापळा रचला आणि पळून जाणाऱ्या आरोपींचा पाठलाग करून त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी कबुली दिली की, त्यांनी युट्यूबवर व्हिडिओ पाहून उबर ॲपद्वारे गाडी बुक केली होती. ओळख लपवण्यासाठी त्यांनी सिमकार्डचा वापर केला आणि गाडीचा जी.पी.एस. काढून टाकला होता. पोलिसांनी चोरीला गेलेली स्विफ्ट डिझायर गाडी आणि गुन्ह्यात वापरलेले साहित्य जप्त केले असून, तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास प्रभारी अधिकारी हेमंत थोरात करत आहेत.

ही कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. हेमंत थोरात, पोनि. मनोज मोंढे, सफौ. राकेश खेडकर, पोहेकॉ. शैलेश रोहोकले, पोकॉ. दिपक फुंदे, पोकॉ. नवनाथ दहिफळे, पोकॉ. किशोर जाधव, पोकॉ. राहुल गुंड आणि पोकॉ. अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मूळ साधन जपावे







काम यथातथाच करायचे पैसे मात्र सारखे उकळायचे. हे मालकाला कसे चालायचे? त्याचे तर दिवाळेच निघायचे. मग एक दिवस आपल्याही नोकरीवर गंडांतर यायचे. तेव्हा पोट कसे भरायचे? म्हणून आपल्याला सुधारायचे. प्रामाणिकपणे कष्ट करायचे. आपल्या कमाईचे साधन आपणच जपायचे. धनी दिसला उदार, म्हणून काय सतत मागायचे उधार? हे वागणे बेजबाबदार. मालक अशाला कामावरून काढून टाकणार. पोटाला घालणाऱ्याला जगवायचे, तरच आपलेही मरण टळायचे. हेच जैन तत्त्वज्ञानातील, 'जीवो जीवस्य जीवनम् ।' या उक्तीचे तात्पर्य समजायचे. देणारा जिवंत राखावा, तरच त्याच्यावर अवलंबून असलेले जिवंत राहणार. म्हणूनच म्हणायचे, एक जीव दुसऱ्या जीवांचे जीवन. म्हणून महाभारतात विदुरनीती सांगते की,

भुंगे फुलातला मध चाखतात; पण फुलाला राखतात. फुलाला अलगद स्पर्श करतात. हेच ज्ञानेश्वर माऊली सांगते, भ्रमर परागु नेती परी कमलदले नेणती ।। भ्रमर मध नेतात, हे कमळाच्या पाकळ्या कुठे जाणतात? त्यांना कळतेच कुठे, की भ्रमरांनी आपला आतला मध नेला? दाता हाच आपला त्राता. त्याला न ये दुखवता. आपलेच ओढेल मरण तो संपता. हळुवारपणा किती? की मध नेला तरी कमळाला न एवढीही क्षती!

शासनकर्त्यांनी लोकांकडून कर उकळावे; पण लोक जगतील हे पाहावे. कराच्या भाराने लोकांचे कंबरडे मोडले, तर शासन गडगडले. शासनाचे धोरण चुकले, की लोकांना त्यांच्याविरुद्ध दंड ठोकले. मग शासनाने कुणाचे हित साधले? ना लोकांचे ना आपुले !

संत तुकाराम महाराज म्हणतात, परिमळ म्हणून चोळू नये फूल । खाऊ नये मूळ आवडते ।। फूल हुंगले, सुगंधाने मन भरले, म्हणून काय सगळा सुगंध एकदम लुटायला फूलच चुरगळले? हे आततायीपणाचे कृत्य झाले. त्याने सुगंध मिळणे खुंटले. कारण त्याचे मूळच उखडले. जे आवडले ते राखून उपभोगले. दांडगाईने मूळच नष्ट केले, तर आनंद मिळणे संपले. मुद्दल राखावे, व्याजावर जगावे. तुका म्हणे वर्म दावू लोका । तुकाराम महाराज म्हणतात, मूळ जोपासा, त्याला धक्का लावू नका. त्याचे फायदे अवश्य चाखा. हे खरे ज्ञान ध्यानात ठेवा.

एक होता देवदत्त. तो रानात कामाला जायचा. दुपारी एका गर्द सावलीच्या झाडाखाली झोपायचा. त्या झाडावर होते मधाचे पोळे. त्यातून मधाचा थेंब गळे. झोपलेल्या देवदत्ताच्या मुखात पडे. देवदत्त ते सहज गिळे. ही मधुरता रोज रोज मिळे. पण थेंबाथेंबाने देवदत्ताला समाधान कुठे? त्याला एकदा वाटले, की पोळे पाडले आणि सगळा मध एकदम लुटला, तर किती मजाच येईल ! दुसऱ्या दिवशी त्याने आणली काठी आणि चढला त्या झाडावर. मारली काठी त्या मधांच्या पोळ्यावर. पोळे तुटले, खाली पडले. मध जमिनीवर सांडला. तेही असते परवडले; पण इकडे मधमाश्यांनी देवदत्ताला घेरले. त्यांनी देवत्ताला कडकडून चावे घेतले. देवदत्ताला ते असह्य झाले. त्याचे बळ गळाले. फांदी पकडणारे हात सुटले. शरीर उंचावरून जमिनीवर आपटले. त्याचे पाय मोडले. मध तर आधीच मातीत मिसळला. मधही गेला नि पायही मोडला.

**– किशोर गांधी**

# नगरमध्ये २३ ते २५ जून दरम्यान मोफत 'निरोगी हृदय – आदर्श जीवनपध्दती कोर्स'



नगर – येथील आनंदऋषीजी मेडिटेशन सेंटर (ब्लड बँकेच्या खाली) मध्ये तीन दिवसीय 'निरोगी हृदय–आदर्श जीवनपध्दती कोर्स'चे आयोजक करण्यात येत आहे. सदर कोर्स प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी डिपार्टमेंटच्या वतीने घेण्यात येत आहे. त्यांना ब्रह्माकुमारीज् संस्था तसेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर रोटरी पीस अँन्ड हार्मनी सेंटर यांचे सहकार्य लाभत आहे. अशी माहिती आनंदऋषीजी हॉस्पिटलचे व्यवस्थापक डॉ. आशिष भंडारी यांनी दिली.

सदर कोर्स २३, २४, २५ जुन रोजी रोज सकाळी ९ ते ११.३० या कालावधीत घेण्यात येणार असुन यामध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित भराडीया तसेच राजयोगा जीवनपध्दतीच्या अभ्यासक बी के राजराजेश्वरी, बी के डॉ. सुधा कांकरिया हे मार्गदर्शन करणार आहेत असे प्रतिपादन समन्वयक डॉ. सुधा कांकरिया यांनी केले.

हा कोर्स म्हणजे हृदयरोगी रूग्णांसाठी एक सुवर्णसंधी असुन यामध्ये निरोगी हृदयासाठी आदर्श जीवनपध्दती विषयक स्लाईड शो व्दारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हृदयरोग का होतो? तो कसा टाळता येतो? आहार–विहार–व्यवहार कसा असावा? मानसिक ताणतणाव यापासुन कशी सुटका करावी? हृदयाची रचना व त्याचे कार्य कसे चालते? हृदयामध्ये ब्लॉकेज कसे तयार होतात? ते कसे टाळता येतात? ई सी जी, एन्जीओग्राफी म्हणजे काय? ताणतणावमुक्त जीवन जगण्यासाठी राजयोगा मेडिटेशनचा कसा उपयोग करता येतो. याची सविस्तर माहिती उदाहरणासहित स्पष्ट करण्यात येणार आहे. हृदयविकार होण्याचे ७०% कारण मानसिक प्रदुषण आहे व ३०% चुकीची आहार पध्दती व व्यायामाचा अभाव हे आहे. त्यात अनियमित झोप, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोटापा, धुम्रपान, व्यसन, रक्तात वाढलेली कोलेस्ट्रॉलची पातळी, अनुवांशिकता हे घटक हृदयरोग बळावण्यासाठी कारणीभूत ठरतात यांनाच रिस्क फॅक्टर म्हणतात. २०१५ च्या अहवालाप्रमाणे सुमारे ६२ मिलीयन व्यक्ती भारतात हृदयविकाराचे शिकार झाले आहेत. त्यामधील ३७ मिलीयन व्यक्तींचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे. त्यातील २.९ मिलीयन व्यक्ती हृदयरोगामुळे दरवर्षी मृत्यु पावतात. गेल्या काही दशकात जवळपास ३००% पेक्षा जास्त हृदयरोगाचे रूग्ण भारतात वाढले आहेत. हे चित्र भयावह आहे. याचा वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. यासाठीच 'निरोगी हृदय–आदर्श जीवनपध्दती' या कोर्सचे आयोजन केले आहे असे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिकेत कटारिया यांनी सांगितले. सदर कोर्स मोफत असुन नांवनोंदणी करणे मात्र आवश्यक आहे. २० जुन पर्यंत नांवनोंदणी करायची आहे. एका हृदयरोगी रूग्णासमवेत एक नातेवाईक असणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरीचे अध्यक्ष रो.सुभाष गर्जे, सचिव रो. आदिनाथ ठोंबे प्रयत्नशील आहेत. याचा लाभ घ्यावा असे आवाहन आंनदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात येत आहे. नांवनोंदणीसाठी प्रिया दिदी ९८५०८८७८३८ येथे त्वरीत संपर्क साधावा.

# भारतीय सैन्य दलामध्ये लेफ्टनंटपदी यश आंबेकर



नगर – येथील रहिवासी यश आंबेकर यांची भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदी नियुक्ती झाली असून देहरादून येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती दौपदी मुर्मु यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

मुळचे नगर येथील असलेले यश आंबेकर यांनी जुलै २०२२ मध्ये इंडियन आर्मी टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स केला. यात ऑल इंडिया ५९ वी रँक त्यांनी मिळविले. सुरूवाचे एक वर्ष गया तेथील ऑफीसर्स ट्रेनिंग ॲकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेऊन कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरींग, पुणे येथे तीन वर्षाचे अतिशय खडतर प्रशिक्षण पूर्ण करून १३ जून रोजी इंडियन मिलिटरी ॲकॅडमी, देहरादून येथे लेफ्टनंटपदी त्यांची नियुक्ती झाली. माजी नौसेना अधिकारी ज्ञानेश्वर आंबेकर यांचे ते चिरंजीव आहेत.

# 'लायन्स युवा सांस्कृतिक देवाणघेवाण' कार्यक्रमामध्ये अहिल्यानगरच्या ४ लिओ सदस्यांची आंतरराष्ट्रीय निवड

### जिनेश छाजेड, आरजाकौर वधवा, ओम भंडारी व सई काळे यांचा समावेश; नॉर्वे, स्पेन व जर्मनी येथे जाण्याची संधी




नगर – लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या लायन्स युवा सांस्कृतिक देवाणघेवाण (लायन्स युथ एक्सचेंज प्रोग्राम) उपक्रमाला यंदा विशेष यश मिळाले असून, प्रथमच शहरातील चार लिओ सदस्यांना विविध युरोपीय देशांतील आंतरराष्ट्रीय युवा देवाणघेवाण शिबिरांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

यापूर्वी गेल्या तीन वर्षांपासून लायन्स क्लब ऑफ अहमदनगरने या कार्यक्रमांतर्गत विविध देशांतील युवा प्रतिनिधींना अहिल्यानगरमध्ये होस्ट करून भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली होती. मात्र यंदा प्रथमच क्लबच्या स्वतःच्या लिओ सदस्यांची परदेशातील युवा देवाणघेवाण कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष लायन डॉ. संजय असनानी, लिओ क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष लिओ गुरनूरसिंग वधवा तसेच युवा देवाणघेवाण कार्यक्रमाचे अध्यक्ष लायन हरजीतसिंग वाधवा यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत जिनेश सुनील छाजेड यांची नॉर्वे, कु. आरजाकौर वधवा यांची स्पेन, तर ओम किरण भंडारी आणि सई ज्ञानेश्वर काळे यांची जर्मनी येथे निवड झाली आहे. निवड झालेल्या युवकांना संबंधित देशांतील यजमान कुटुंबांमध्ये सुमारे १० दिवस होम–स्टेचा अनुभव घेण्याची संधी मिळणार असून त्यानंतर ११ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय युवा शिबिरात सहभाग घेता येणार आहे. प्रत्येक शिबिरात जगातील विविध देशांमधील सुमारे ३० युवक–युवती सहभागी होणार असून, त्यांना विविध संस्कृती, परंपरा, भाषा, सामाजिक कार्यपद्धती आणि नेतृत्व विकासाचा अनोखा अनुभव मिळणार आहे.

हा युवा देवाणघेवाण कार्यक्रम लायन्स क्लब्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१–ए२, मुंबई यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे डिस्ट्रिक्ट यूथ एक्स्चेंज चेअरमन लायन दीपेश दोशी हे प्रमुख समन्वयक असून, भारतात येणाऱ्या परदेशी युवकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या इंडिया क्लचरल हेरीटेज कॅम्प या विशेष शिबिराचेही ते नियोजन व समन्वय करतात. या शिबिरामध्ये भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची, इतिहासाची, परंपरांची आणि विविधतेची ओळख जगभरातील युवकांना करून दिली जाते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिलीप कुलकर्णी, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरनकौर वाधवा, प्रणिता भंडारी आणि सुनील छाजेड यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शन, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अहिल्यानगरच्या युवकांना ही आंतरराष्ट्रीय संधी उपलब्ध झाली. अहिल्यानगरच्या लायन्स आणि लिओ परिवारासाठी हा अभिमानाचा क्षण असून, या युवा प्रतिनिधींमार्फत भारताची संस्कृती, परंपरा आणि मूल्ये जागतिक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे अहिल्यानगरच्या युवकांना जागतिक स्तरावर मैत्री, नेतृत्व आणि सांस्कृतिक आदानप्रदानाचे नवे क्षितिज खुले झाले आहे.

# राठोड आय ॲण्ड चिल्ड्रन हॉस्पिटलचा १८ जून रोजी 'लोकार्पण सोहळा'




नगर – शहरातील नागरिकांना अत्याधुनिक नेत्ररोग व बालरोग उपचार सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या राठोड आय अँड चिल्ड्रन हॉस्पिटलचे लोकार्पण १८ जून रोजी साय. ६ वाजता आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते तर महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. डॉ. केतन राठोड, डॉ. दर्शना राठोड, डॉ. चेतन राठोड व डॉ. स्वाती राठोड यांच्या पुढाकारातून साकारलेल्या या हॉस्पिटलमध्ये नेत्ररोग निदान व शस्त्रक्रिया, तसेच रेटीना अँड कॉर्निया या आजारांचे संपूर्ण निदान व उपचार, बालरोग उपचार, नवजात शिशूंची विशेष काळजी तसेच आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रुग्णांना दर्जेदार, विश्वासार्ह व तज्ज्ञ आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने हे हॉस्पिटल सुरू करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कोहिनूर मंगल कार्यालय जवळ, एकवीरा चौक रोड, सावेडी अहिल्यानगर येथे हे नवीन हॉस्पिटल उभारले असून, नागरिकांनीही या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन राठोड आय अँड चिल्ड्रन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

अहिल्यानगरच्या आरोग्य क्षेत्रात नवी दिशा देणाऱ्या या हॉस्पिटलमुळे परिसरातील नागरिकांना आधुनिक उपचार सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्यास मदत मिळणार आहे.

या नवीन हॉस्पिटल चा रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.




बालक मंदिर महिला मंडळ शाळेत प्रवेशोत्सव आणि पाठ्यपुस्तक वितरणाचा कार्यक्रम साजरा झाला.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

नगर – बालक मंदिर महिला मंडळ शाळेत २०२६–२७ च्या शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव आणि पाठ्यपुस्तक वितरणाचा कार्यक्रम साजरा झाला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक ॲड. ऋग्वेद गंधे व नगरसेविका सौ.मयुरी जाधव, सौ. छाया सुरवसे हे उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी केले.

नगरसेवक ऋग्वेद गंधे व नगरसेविका सौ. मयुरी जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी ऋग्वेद गंधे यांनी त्यांच्या शैक्षणिक वाटचालीमधील अनुभव रंजकतेने सांगितले. विद्या हे धन कुणीही चोरून नेऊ शकत नाही हेही त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले व शैक्षणिक वाटचाली विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

तसेच नगरसेविका सौ. मयुरी जाधव यांनी शाळेमध्ये नवनवीन उपक्रम घ्यावेत व त्या उपक्रमांमध्ये आम्हालाही सहभागी होण्याची संधी द्यावी, हे विचार मांडले.

सौ. ज्योतीताई केसकर यांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे महत्त्व सांगितले आणि नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सौ. ज्योती कुलकर्णी, सौ. रोहिणी पुंडलिक, श्रीम चितांबर, छाया सुरवसे, सौ. प्रेमलता सोनग्रा, श्री. बडवे आदी उपस्थित होते. सौ. टकू पवार यांनी आभार मानले. फलकलेखन श्रीमती मेंद्रे व सौ. कवाष्टे यांनी केले. सूत्रसंचालन निरुपमा देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# किशोर संस्कृत संवर्धिनी विभागातील मुलांचा शाळेचा प्रवेशोत्सव साजरा

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक वर्ग किशोर संस्कृत संवर्धिनी विभागातील मुलांचा शाळेचा पहिला दिवस १५ जून रोजी (प्रवेशोत्सव) साजरा करण्यात आला.

पारंपारिक पद्धतीने आंब्याच्या पानांचे तोरण रांगोळी काढून तसेच विविध शैक्षणिक साधन यांनी वर्ग सजवले गेले.

मुलांचे औक्षण करून व रिबिन कट करून उद्घाटन करण्यात आले. त्याचबरोबर शिक्षकांचेही औक्षण करण्यात आले. शिक्षकांनी आपापल्या वर्गातील फळक लेखन अतिशय सुंदर केले.






अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक वर्ग किशोर संस्कृत संवर्धिनी विभागातील मुलांचा शाळेचा पहिला दिवस साजरा करण्यात आला.

प्रार्थना, राष्ट्रगीत व प्रतिज्ञा घेण्यात आली. छोट्या गटातील व मोठ्या गटातील मुले उपस्थित होते. छोट्या गटाची मुले लहान असल्यामुळे सुरवातीला रडत होती नंतर पालक व शिक्षकांच्या सहकार्याने मुलांना शांत करण्यात आले.

मुलांना गोड पदार्थ (खाऊ) म्हणून बिस्कीट पुडे देण्यात आली.

अशा प्रकारे शाळेचा पहिला दिवस आनंदाने व हसत खेळत साजरा करण्यात आला. यावेळी अ. ए. सो. चा पूर्व प्राथमिक वर्गाच्या इनचार्ज सौ. वर्षा चिखले व शिक्षिका सौ. रेणुका जायभाय, सौ. भारती गोफणे, सौ. अश्विनी शेळके, सौ. वर्षा गायकवाड, सौ. मोनिका चव्हाण व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# सावेडीमध्ये २० जूनपासून तुलसी रामायण कथेस प्रारंभ

नगर – चिन्मय अमृत महोत्सवी वर्षा निमित्त अहिल्यानगर चिन्मय मिशन द्वारा आयोजित सुंदरकांड तुलसी रामायण कथेचा सावेडी येथील माऊली सभागृह येथे २० जूनपासून प्रारंभ होत आहे, अशी माहिती नगर शाखेचे अध्यक्ष ॲड. धोंडीराम घोरपडे यांनी दिली.

स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांच्या पावन अमृत वाणीतून स्त्रवणाऱ्या कथा श्रवणाची संधी अहिल्यानगर मधील नागरिकांना होत असून २० ते २५ जून पर्यंत ही कथा दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. प्रवेश विनामूल्य आहे. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा. असे आवाहन सचिव देवराम मोरे यांनी केले आहे.

या कथा सोहळ्यास चिन्मय मिशनचे स्वामी प्रत्ययानंद सरस्वती उपस्थित राहणार आहेत. तुलसी रामायण कथा, रामचरितमानस मधील सुंदरकांड हे श्रीराम – भक्त हनुमान यांचे माहात्म्य गुण, प्रभाव व लीला यांचे वर्णन सांगितले आहे.कलियुगाच्या सर्व दोषांचा परिहार सुंदर कांडाचे श्रवण – पठणाने होतो. हनुमंताची भक्ती म्हणजे रामकृपेची प्राप्ती होते, असा या सुंदरकांडाचा सार आहे. त्याचा लाभ अहिल्यानगरमधील नागरिकांनी घ्यावा, असे स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी सांगितले.

# कॅलिडोस्कोप

## का वाढतात उंदीर?

पृथ्वीवर प्राण्यांच्या लाखो प्रजाती आढळतात. यातील काही प्राणी नामशेष झाले आहेत तर काही प्राण्यांची लोकसंख्या वाढत आणि कमी होत आहे. शहरांमध्ये उंदरांची संख्या झपाट्याने का वाढत आहे, हे जाणून घेतले पाहिजे. तीव्र हवामानबदलाच्या काळातही उंदरांच्या संख्येत फरक नाही, उलट वाढतच आहे. शहरांमध्ये, घरांमध्ये, कार्यालयांमध्ये, रेल्वे स्थानकांवर, बसस्थानकांवर, मेट्रोमध्ये सर्वत्र उंदीर दिसतात. शहरांमधील तापमान खेड्यांच्या तुलनेत जास्त असतानाही उंदरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. जागतिक तापमानवाढीबरोबरच झपाट्याने वाढणारे शहरीकरण हे त्यामागील प्रमुख कारण आहे. उंदीर ५० हून अधिक झुनोटिक रोग पसरवतात. वास्तविक, झुनोटिक रोग हे मानव आणि प्राण्यांमध्ये पसरणारे संक्रमण आहे. हे संक्रमण विषाणू, जीवाणू, परजीवी आणि बुरशी यासारख्या जंतूंमुळे होते. यापैकी काही संक्रमण प्राणघातक ठरू शकते. शहरांमधील उंदरांच्या वाढत्या संख्येमुळे आरोग्यतज्ज्ञ चिंतेत आहेत. संशोधकांनी या अभ्यासात १६ शहरांचा समावेश केला. त्यापैकी अकरा शहरांमध्ये उंदरांच्या संख्येत मोठी वाढ नोंदवण्यात आली. ज्या शहरांमध्ये सरासरी तापमान सामान्यपेक्षा जास्त होते, तेथे उंदरांच्या संख्येत ४०.७ टक्के वाढ नोंदवली गेली.



तापमान सामान्यपेक्षा कमी नोंदवले गेलेल्या ठिकाणी उंदरांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून आले आहे. संशोधनात उंदरांच्या दोन प्रजातींवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. नॉर्वे जिकस उंदीर जगभरात पसरले आहेत. कृषी उत्पादन आणि अन्न पुरवठ्याचे सर्वाधिक नुकसान करण्यासाठी त्यांना जबाबदार मानले जाते. अहवालानुसार, एकट्या अमेरिकेत उंदरांमुळे झालेल्या नुकसानाची अंदाजे वार्षिक किंमत एकूण २७ अब्ज डॉलर इतकी आहे.

## डायमंड हार्बर बंदराचा वैभवशाली इतिहास



पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात हुगळी नदीच्या काठावर वसलेले डायमंड हार्बर आज शांत नदी बंदर आणि आठवड्याच्या शेवटी फिरण्यासाठी प्रसिद्ध ठिकाण म्हणून ओळखले जाते; मात्र त्याचा इतिहास अत्यंत वैभवशाली आणि रहस्यमय आहे. या प्रदेशाने समुद्री चाच्यांचा दहशतवाद, मीठाचा ऐतिहासिक व्यापार आणि ब्रिटिशकालीन अनेक घडामोडी अनुभवलेल्या आहेत. इतिहासानुसार, आजच्या डायमंड हार्बरचे मूळ नाव चिंगरीखाली होते. हुगळी नदीत मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या कोळंबी (चिंगरी) माशांमुळे किंवा स्थानिक च्वार जमातीच्या प्रभावामुळे हे नाव पडल्याचे मानले जाते. पुढे या भागाला हाजीपूर असे नाव मिळाले. येथे मचलंदपीर यांचा दर्गा होता आणि प्लेगग्रस्त लोकांसाठी आश्रयस्थान म्हणूनही हे ठिकाण ओळखले जात होते. नंतर ब्रिटिशांनी या परिसराचे भौगोलिक आणि व्यापारी महत्त्व लक्षात घेऊन त्याला 'डायमंड हार्बर' असे नाव दिले. हे नाव हिऱ्यांमुळे नव्हे, तर येथे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या पांढऱ्या मीठाच्या व्यापारामुळे पडले. सूर्यास्ताच्या वेळी नदीकिनारी साठवलेल्या मिठाचे ढीग हिऱ्यांप्रमाणे चमकत असत. त्या दृश्याने प्रभावित होऊन ब्रिटिशांनी हे नाव दिले. १८५१ च्या ईस्ट इंडिया कंपनीच्या राजपत्रातही या बंदराच्या व्यापारी महत्त्वाचा उल्लेख आढळतो. सोळावे आणि सतरावे शतक या भागासाठी अस्थिरतेचे होते. त्या काळात मुघल आणि पोर्तुगीज समुद्रीचाचे, ज्यांना 'हरमद वाहिनी' म्हटले जाई, या परिसरात मोठा त्रास देत असत. त्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ब्रिटिशांनी १८६८-६९ मध्ये येथे चिंगरीखाली किल्ला उभारला. स्थानिक लोक त्याला 'जुना किल्ला' असेही म्हणत. आज या किल्ल्याचे अवशेष जवळजवळ नाहीसे झाले असले, तरी तो त्या काळातील संघर्षाची साक्ष देतो. डायमंड हार्बरचा भारताच्या आधुनिक विकासातही महत्त्वाचा वाटा आहे. १८५१ मध्ये भारतातील पहिली टेलिग्राफ लाईन कोलकाता आणि डायमंड हार्बर दरम्यान टाकण्यात आली. १८५७ मध्ये या ठिकाणाला उपविभागीय मुख्यालयाचा दर्जा मिळाला. प्रसिद्ध साहित्यिक बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी १८६४ मध्ये येथे डेप्युटी मॅजिस्ट्रेट म्हणून काम केले. १८८३ मध्ये येथे रेल्वेमार्ग पोहोचला आणि या भागाचा आधुनिक जगाशी अधिक जवळचा संबंध प्रस्थापित झाला. १९३० च्या मीठाच्या सत्याग्रहादरम्यानही येथील नागरिकांनी वकील चारुचंद्र भंडारी यांच्या नेतृत्वाखाली सक्रिय सहभाग घेतला होता. त्या चळवळीच्याआठवणी आजही येथील 'खादी मंदिर'मध्ये जतन करण्यात आल्या आहेत.

## वृद्धाने घातले स्वत:चे श्राद्ध

मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील करेरा भागातील हाजीनगर गावात एका ६० वर्षीय अविवाहित वृद्धाने अत्यंत असामान्य पाऊल उचलले आहे. आपल्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कार कोण करणार, याची चिंता सतत मनात असल्या नेत्यांनी जिवंत असतानाच स्वत:चे अंत्यविधी आणि सामुदायिक भोजन आयोजित केले. कल्याण पाल नावाचे हे वृद्ध गावात एकटेच राहतात. त्यांचे जवळचे कोणतेही नातेवाइक नाहीत. कुटुंबातील ते एकुलते एक असून त्यांनी कधीही विवाह केलेला नाही. मृत्यूनंतर धार्मिक विधी योग्य रीतीने पार पडतील की नाही, या विचाराने ते अस्वस्थ होते. या कार्यक्रमाच्या दोन दिवस आधी कल्याण पाल प्रयागराजला गेले होते. तेथे त्यांनी स्वत:च्या नावाने धार्मिक विधी पूर्ण केले आणि गंगास्नानही केले. हे स्नान अस्थिविसर्जनानंतर होणाऱ्या परंपरागत स्नानासारखेच होते. गावात परतल्यानंतर त्यांनी २४ तासांचा भजन-कीर्तन कार्यक्रम आयोजित केला. त्यानंतर मोठ्या प्रमाणात सामुदायिक भोजनाचे आयोजन करण्यात आले. आसपासच्या गावांमधून सुमारे ६ ते ७ हजार लोक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पारंपरिक श्राद्धभोजन प्रमाणे सर्व व्यवस्था करण्यात आली होती; मात्र एकच फरक होता, ज्या व्यक्तीसाठी हे भोजन ठेवण्यात आले होते, ती व्यक्ती स्वत: उपस्थित राहून पाहुण्यांचे स्वागत करत होती. पाहुण्यांसाठी बसण्याची आणि भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे निमंत्रण पत्रक काही दिवसांपूर्वी 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. त्यात 'अंतिम गंगा-पूजन आणि स्वत:च्या उपस्थितीत होणारे भोजन' असे वर्णन करण्यात आले होते.



## महिलांना निर्वस्त्र फिरण्यासाठी राखीव बेट!

जगामध्ये अशी अनेक ठिकाणे आहेत जी त्यांच्या आगळ्यावेगळ्या नियमांसाठी ओळखली जातात. असेच एक बेट सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. या बेटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे पुरुषांना येण्यास सक्त मनाई आहे. हे बेट पूर्णपणे महिलांसाठी राखीव असून, महिलांना तणावमुक्त वातावरण मिळावे या उद्देशाने त्याची निर्मिती करण्यात आली आहे. येथे महिला कोणत्याही वेळी, कशाही फिरत असतात. येथे महिला निर्वस्त्र फिरत असतात.फिनलंडमधील 'सुपरशीआयलंड' असे या बेटाचे नाव आहे. या अनोख्या बेटाची संकल्पना अमेरिकन उद्योजिका क्रिस्टीना रोथ यांची आहे. क्रिस्टीना यांना असे वाटले, की जेव्हा पुरुष आजूबाजूला असतात, तेव्हा महिला स्वतःकडे पूर्णपणे लक्ष देऊ शकत नाहीत किंवा त्या काहीशा दडपणाखाली असतात. महिलांना निसर्गाच्या सानिध्यात स्वतःचा शोध घेता यावा आणि एकमेकींना प्रोत्साहन देता यावे, यासाठी त्यांनी हे बेट खरेदी केले. हे बेट फिनलंडच्या किनारपट्टीवर वसलेले असून अत्यंत सुंदर आहे. येथे महिलांसाठी खास सोयीसुविधा उपलब्ध आहेत.



येथे योग, ध्यान आणि निरोगी जीवनशैलीवर आधारित उपक्रम राबवले जातात. महिलांसाठी विशेष कुकिंग क्लासेस आणि फिटनेस सेशन्सचे आयोजन केले जाते. निसर्गाच्या कुशीत राहण्यासाठी येथे आलिशान केबिन्स आणि साउना सुविधा उपलब्ध आहेत.

हे बेट सर्वांसाठी खुले असले तरी, तिथे जाणे इतके सोपे नाही. या बेटावर जाण्यासाठी महिलांना ऑनलाईन अर्ज करावा लागतो. क्रिस्टीना रोथ स्वतः या अर्जांची छाननी करतात. केवळ त्याच महिलांना येथे प्रवेश दिला जातो, ज्या खरोखरच स्वतःच्या आरोग्यासाठी आणि मानसिक शांततेसाठी वेळ देऊ इच्छितात. एकावेळी या बेटावर मोजक्याच महिलांना राहण्याची परवानगी दिली जाते. क्रिस्टीना यांच्या मते, हे बेट पुरुषांचा द्वेष करण्यासाठी नाही, तर महिलांना त्यांचे 'स्त्रीत्व' आणि 'स्वातंत्र्य' साजरे करण्यासाठी बनवले आहे. पुरुषांच्या उपस्थितीत महिला अनेकदा सजण्या-धजण्याकडे किंवा इतरांच्या प्रतिक्रियेकडे जास्त लक्ष देतात; मात्र या बेटावर त्या कोणत्याही दबावाशिवाय मुक्तपणे वावरू शकतात.

## कॉकरोच जनतापार्टीचे एक कोटींहून अधिक फॉलोअर्स

सध्या देशभरात 'कॉकरोच जनता पार्टी'ची 'सोशल मीडिया'वर जोरदार चर्चा सुरू आहे. सुरुवातीला लोकांनी याला निव्वळ एक गंमत किंवा 'मीम' समजले होते; परंतु अवघ्या पाच दिवसांत या पार्टीने इन्स्टाग्रामवर १ कोटी फॉलोअर्सचा टप्पा पार करून इतिहास रचला आहे. फॉलोअर्सच्या शर्यतीत या डिजिटल पार्टीने भारतीय जनता पक्षाला मागे टाकले असून, लवकरच ती काँग्रेसलाही मागे टाकण्याच्या तयारीत आहे. एका विधानावरून सुरू झालेली ही चळवळ आता 'सोशल मीडिया'वर प्रचंड ट्रेंड होत आहे. अनेकांना 'कॉकरोच जनता पार्टी' नाव वाचून देशात नवा पक्ष आला की काय? असा प्रश्न पडला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या एका विधानामुळे झाली. एका सुनावणीदरम्यान बोलताना, 'काही बेरोजगार तरुण झुरळांप्रमाणे व्यवस्थेवर हल्ला करतात. ते कायदा, प्रसारमाध्यमे आणि आरटीआय चळवळीसारख्या यंत्रणांमध्ये घुसखोरी करत आहेत,' अशी टिप्पणी त्यांनी केली होती. या विधानानंतर तरुणांमध्ये तीव्र संताप व्यक्त झाला. 'हे विधान सामान्य बेरोजगार तरुणांसाठी नसून बनावट पदव्या घेणाऱ्यांसाठी होते,' असे स्पष्टीकरण नंतर सरन्यायाधीशांनी दिले; परंतु तोपर्यंत 'सोशल मीडिया'वर संतापाचा उद्रेक झाला होता. तरुणांचा अपमान झाल्यानंतर त्याचा निषेध करण्यासाठी एक अनोखी चळवळ उभी राहिली. मूळचे छत्रपती संभाजीनगरचे असणारे आणि सध्या अमेरिकेतील बोस्टन येथे पदव्युत्तर शिक्षण घेणारे अभिजीत दीपके यांनी या संतापाला एक डिजिटल रूप दिले. त्यांनी बोस्टनमध्ये बसूनच 'कॉकरोच जनता पार्टी' नावाने एक वेबसाईट, इन्स्टाग्राम हँडल आणि एक्स (ट्विटर) खाते सुरू केले. बघता बघता देशातील लाखो तरुण या मोहिमेत सामील झाले.




## जुन्या पँटच्या खिशात सापडलेल्या तिकिटाने बदलले नशीब!



अमेरिके तील न्यू जर्सी राज्यात राहणाऱ्या एका व्यक्तीचे नशीब अचानक पालटले. त्याला जुन्या पँटच्या खिशात एक विसरलेले लॉटरी तिकीट सापडले. विशेष म्हणजे त्या तिकिटाची मुदत संपायला फक्त काही दिवस उरले होते. तिकीट तपासल्यानंतर त्याला समजले, की तो कोट्यवधी रुपयांच्या जॅकपॉटचा विजेता आहे. न्यू जर्सीतील या व्यक्तीने गेल्या वर्षी मे महिन्यात एका पेट्रोल पंपावरून पिक-६ लॉटरीचे तिकीट खरेदी केले होते. तो त्या पेट्रोल पंपावर नियमित जात असे आणि अधूनमधून लॉटरीची तिकिटेही घेत असे. तिकीट घेतल्यानंतर त्याने ते कुठेतरी ठेवले आणि नंतर त्याबद्दल पूर्णपणे विसरून गेला. अनेक महिने त्याला याची कल्पनाही नव्हती, की त्याच्याकडे कोट्यवधी रुपयांचे बक्षीस जिंकणारे तिकीट पडून आहे. दरम्यान, गेल्या महिन्यात लॉटरी विभागाने जाहीर सूचना काढून सांगितले, की मोठ्या रकमेचे एक बक्षीस अद्याप कुणीही दावा केलेले नाही आणि त्याची मुदत लवकरच संपणार आहे. या घोषणेत ज्या पेट्रोल पंपाचा उल्लेख होता, तोच पंप त्या व्यक्तीच्या नेहमीच्या भेटीचा असल्याने त्याचे लक्ष या बातमीकडे गेले. सुरुवातीला त्याला यावर विश्वास बसला नाही; मात्र उत्सुकतेपोटी तो त्या पेट्रोल पंपावर गेला आणि तेथील कर्मचाऱ्यांशी बोलला. कर्मचाऱ्यांनी त्याला सांगितले, की पिक-६ खेळणारे नियमित ग्राहक फारच कम ीअसतात. त्यांनी त्याला घरातील जुने सामान, कपाटे, ड्रॉवर आणि कपड्यांचे खिसे तपासण्याचा सल्ला दिला. यानंतर त्याने घरभर शोधमोहीम सुरू केली. कपाटे, स्टोअररूम, जुन्या बॅग्स आणि अनेक महिन्यांपासून न वापरलेल्या पँटचे खिसेही त्याने तपासले. बराच वेळ शोध घेतल्यानंतर अखेर एका जुन्या पँटच्या खिशात त्याला दुमडलेले लॉटरी तिकीट सापडले. तिकिटावरील क्रमांक तपासताच तो काही क्षण स्तब्ध झाला. त्याच्या हातात तेच जॅकपॉट तिकीट होते, ज्याची अनेक दिवस चर्चा सुरू होती. या तिकिटामुळे त्याला ५.९ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स, म्हणजेच भारतीय चलनात अंदाजे ५७ कोटी रुपये मिळाले. ही आनंदाची बातमी समजताच त्याने तात्काळ लॉटरी कार्यालयाशी संपर्क साधला आणि तिकिटाची मुदत संपण्याच्या अवघ्या आठ दिवस आधी बक्षिसाचा दावा केला.

## चीनमध्ये वाघाचे मूत्र पाजण्याचा व्यवसाय!

चीनमधील प्राणीसंग्रहालय सध्या सोशल मीडियावर लोकांच्या चर्चेचा विषय बनले. कारण खूप धक्कादायक आहे. देशाच्या सिचुआन प्रांतात असलेल्या या प्राणीसंग्रहालयात वाघाचे मूत्र विकले जाते. यामुळे सांधेदुखीसह इतर अनेक आजार बरे होऊ शकतात, असा दावा केला जात आहे. पांढऱ्या वाईनमध्ये मिसळून प्यायल्यास ते आणखी प्रभावी ठरते, असा दावाही करण्यात आला आहे. येथील लोक वाघाच्या मूत्राच्या बाटलीसाठी सुमारे ६०० रुपये मोजायला तयार आहेत. सिचुआन प्रांतातील यान बायफेंगक्सिया वन्यजीव प्राणीसंग्रहालयाचा दावा आहे, की वाघाच्या मूत्रात पांढरी वाइन मिसळल्याने आरोग्यावर चांगला परिणाम होतो. 'साऊथ मॉर्निंग चायना पोस्ट'नुसार, प्राणीसंग्रहालयातून परतणाऱ्या एका व्यक्तीने सोशल मीडियावर याची माहिती दिली. तेव्हा ही बाब समोर आली. व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, येथे सायबेरियन वाघांचे मूत्र लोकांना विकले जात आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. वाघाच्या मूत्राच्या २५० मिलीलीटर बाटलीची किंमत ५० युआन (म्हणजे अंदाजे ६०० रुपये) आहे. रिपोर्टनुसार, बाटलीवर स्पष्टपणे लिहिले आहे, की यामुळे सांधेदुखी, स्नायूंच्या दुखण्यापासून आराम मिळतो. त्याचा वापर कसा करायचा हेही समजावून सांगितले आहे. पांढऱ्या वाईनमध्ये आल्याचा तुकडा मिसळून प्यावे, असे लिहिले आहे. लोकांना कोणत्याही प्रकारची ॲलर्जी असल्यास त्याचा वापर करू नये असा इशाराही देण्यात आला आहे. तज्ज्ञांनी याला दिशाभूल करणारे म्हटले आहे. एका चिनी फार्मासिस्टने सांगितले, की या प्रकरणामुळे केवळ वाघांच्या संवर्धनालाच हानी पोहोचत नाही, तर पारंपारिक चीनी औषधांची बदनामीही होत आहे. फार्मासिस्टने सांगितले, की वाघाचे मूत्र उपचार म्हणून वापरले जात असल्याचा कोणताही पुरावा नाही; मात्र या व्यवसायाचा परवाना आपल्याकडे असल्याचा दावा प्राणीसंग्रहालयाने केला आहे.



## स्वच्छतेचा आदर्श!



स्वच्छतेसाठी संपूर्ण समुदाय एकत्र येतो तेव्हा चमत्कार घडतो. याचं जिवंत उदाहरण म्हणजे मेघालयातील मावलिनॉन्ग हे गाव. 'आशियातील सर्वात स्वच्छ गाव' म्हणून ओळख मिळवलेल्या या छोट्याशा गावाची चर्चा आता उद्योगपती आनंद महिंद्रा यांनीही केली आहे. त्यांच्या मते, मावलिनॉन्ग हे केवळ एक गाव नसून संपूर्ण भारतासाठी प्रेरणास्थान आहे.

मेघालयातील पूर्व खासी हिल्स जिल्ह्यात वसलेले मावलिनॉन्ग हे घनदाट जंगल आणि निसर्गरम्य वातावरणाने वेढलेले आहे. स्वच्छता आणि शिस्त यासाठी हे गाव जगभरात प्रसिद्ध आहे. येथे रस्ते स्वच्छ आहेत, बांबूच्या कचरापेट्या सर्वत्र ठेवण्यात आल्या आहेत आणि प्रत्येक घराबाहेर हिरवळ सजवलेली दिसते. स्वच्छता येथे केवळ दिखावा नसून जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे.

आनंद महिंद्रा यांनी या गावाचे कौतुक करताना 'इट टेक्स अ व्हिलेज टू रेज अ चाईल्ड' ही म्हण शेअर केली. त्याचा अर्थ असा, की जबाबदारी एका व्यक्तीची नसून संपूर्ण समुदायाची असते. मावलिनॉन्गमध्ये हीच भावना दैनंदिन जीवनात दिसून येते. येथे स्वच्छता ही सरकारी मोहीम नसून लोकांची सवय आणि संस्कृती बनली आहे. या गावात प्रत्येक घरात ओला आणि सुका कचरा वेगळा केला जातो. प्लास्टिकचा वापर अत्यंत कमी आहे आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत तयार केले जाते. गावकरी कचरा व्यवस्थापनाला सामूहिक जबाबदारी मानतात. त्यामुळे संपूर्ण परिसर स्वच्छ आणि सुंदर दिसतो.

मावलिनॉन्गमधील जीवनशैली शहरांच्या तुलनेत अधिक शांत आणि समाधानकारक मानली जाते. ताजी हवा, निसर्गाच्या सान्निध्यातील जीवन आणि मजबूत सामाजिक नाती यामुळे हे गाव वेगळे ठरते. येथे लोक एकत्र काम करतात. सण साजरे करतात आणि परस्परांना सहकार्य करतात. ही सामूहिक भावना गावाची खरी ओळख आहे. सोशल मीडियावर अनेकांनी सुचवले, की संपूर्ण भारताने ईशान्येकडील राज्यांकडून स्वच्छता आणि शिस्त शिकावी. बदल घोषणा देऊन नाही तर सवयी बदलून होतो, हे मावलिनॉन्ग दाखवून देते. प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या घराची आणि परिसराची जबाबदारी घेतली तर देशाची प्रतिमा आपोआप बदलू शकते.

## परग्रहावर जीवनाची शक्यता?

आपण या विश्वात एकटे आहोत का, हा प्रश्न मानवाला शतकानुशतके भेडसावत आहे. आता या रहस्यावरील पडदा हटताना दिसत आहे. पृथ्वीपासून सुमारे सातशे ट्रिलियन मैल अंतरावर असलेल्या 'के २-१८ ब' नावाच्या ग्रहावरून शास्त्रज्ञांना जीवन असल्याचे संकेत मिळाले आहेत.

हा ग्रह पृथ्वीपेक्षा अडीचपट मोठा असून केंब्रिज विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या पथकाकडून त्याच्या वातावरणाचा शोध घेतला जात आहे. 'के २-१८ ब'च्या वातावरणात शास्त्रज्ञांना डायमिथाइल सल्फाइड आणि डायमिथाइल डायसल्फाइड यासारखी रसायनं आढळली आहेत. पृथ्वीवर ही रसायनं सामान्यतः फक्त फायटो प्लँक्टन आणि बॅक्टेरियासारख्या सजीवांद्वारेच तयार केली जातात. हे संकेत अद्याप अंतिम पुरावे मानले जाऊ शकत नाहीत; परंतु प्रमुख संशोधक प्रोफेसर निक्कू मधुसूदन यांच्या मते 'के २-१८ब' वर सजीवांची उपस्थिती शक्य असल्याचं पुढील एक - दोन वर्षांत सिद्ध होऊ शकेल.

### समुद्राच्या अस्तित्वाचेही संकेत

या ग्रहाच्या वातावरणात अमोनियाच्या अनुपस्थितीकडे शास्त्रज्ञांचं लक्ष वेधलं गेलं आहे. त्यांच्या मते 'के-२-१८ ब'वर एक प्रचंड महासागर असू शकतो. हा महासागर सगळा अमोनिया शोषून घेत असावा. अमोनियाची उपस्थिती जीवनाच्या अस्तित्वासाठी एक महत्त्वाचा संकेत असते. म्हणून त्याच्या अनुपस्थितीमुळे ग्रहावर महासागरासारख्या जीवनाला आधार देणाऱ्या संरचना असण्याची शक्यता वाढते. अर्थात तिथे पृष्ठभागाखाली लाव्हाचा महासागर असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. असं असल्यास ते जीवनासाठी प्रतिकूल असेल.




### अधिक अचूक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न

शास्त्रज्ञांना आतापर्यंत 'के२-१८ ब'च्या वातावरणातून 'थ्री-सिग्मा' पातळीची पुष्टी मिळाली आहे. 'सिग्मा' हे वैज्ञानिक अचूकता मोजण्याचं मानक आहे. सामान्यतः जीवनाच्या अस्तित्वाच्या ठोस पुराव्यासाठी 'पाच-सिग्मा' आवश्यक असतात. थ्री-सिग्मा पातळीवर आढळणारे संकेत या दिशेने एक मोठं पाऊल असलं तरी, वैज्ञानिक समुदायाला पूर्णपणे आश्वस्त करण्यासाठी अधिक अचूकता आवश्यक आहे. प्राध्यापक निक्कू मधुसूदन यांच्या मते 'के २-१८ब'वर जीवसृष्टी आढळली, तर ती केवळ एका ग्रहापुरती मर्यादित नसेल, तर या शोधामुळे संपूर्ण विश्वात जीवसृष्टीच्या व्यापक शक्यता उघड होतील. हा शोध केवळ विज्ञानाच्या दृष्टिकोनातूनच नव्हे तर मानवतेच्या भविष्याच्या आकलनासाठीही ऐतिहासिक मानला जाईल.

# ६ वी ते ८ वी वरील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना न्याय द्या; वेतनश्रेणीबाबत तातडीने शासन निर्णय काढा: शिक्षक परिषद

## उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रश्न ऐरणीवर : बाबासाहेब बोडखे



नगर – राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त तसेच शिक्षण संचालक यांना पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये नियुक्त प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वेतनश्रेणी मिळावी, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ६९५ शिक्षकांनी १३ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ८ मे २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत संबंधित शासन निर्णय असंवैधानिक असल्याचे घोषित केले आणि तो रद्द केला. त्यामुळे या प्रश्नाला नव्याने गती मिळाली असून शासनाने आता तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

शिक्षक परिषदेने निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा विषय २०१९ च्या चौथ्या हिवाळी अधिवेशनात विधान परिषद नियम ९३ अन्वये सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान तत्कालीन शालेय शिक्षण मंत्र्यांनी हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी आयुक्त स्तरावर समिती गठित करण्यात आली होती.

आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास समितीने विविध बाबींचा अभ्यास करून शासनाला आपला अहवाल सादर केला आहे. या अहवालात राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना महाराष्ट्र कर्मचारी वेतन नियमावली १९८१ मधील अनुसूची 'क' नुसार प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. समितीने हा निर्णय केवळ प्रशासकीय दृष्टिकोनातूनच नव्हे, तर नैतिकदृष्ट्याही अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित केले आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांकडून उच्च शैक्षणिक पात्रतेच्या आधारे अध्यापनाची जबाबदारी पार पाडली जात असताना त्यांना त्यानुसार वेतनश्रेणी न देणे अन्यायकारक आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे या शिक्षकांच्या मागणीला कायदेशीर आधार मिळाला असून शासनाने आता विलंब न करता वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय जाहीर करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यभरातील हजारो प्रशिक्षित पदवीधर शिक्षक या निर्णयाकडे आशेने पाहत असून शासनाने न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान करून शिक्षक समुदायाला न्याय द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर सकारात्मक निर्णय झाल्यास राज्यातील शिक्षकांना आर्थिक व सेवाविषयक लाभ मिळणार असल्याचेही परिषदेने स्पष्ट केले असल्याचे बाबासाहेब बोडखे यांनी म्हटले आहे.

# शिक्षण उपसंचालक कार्यालयाचा मनमानी कारभार; शिक्षक त्रस्त! प्रस्ताव स्वीकारून पोहच न दिल्यास आंदोलन : 'शिक्षक भारती'



नगर – विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात अहमदनगर, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावांचा फुटबॉल केला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. 'केवळ ईमेल'चे कारण पुढे करत कर्मचाऱ्यांचे हार्ड कॉपी प्रस्ताव नाकारले जात आहेत आणि अधिकृत पोहच दिली जात नाही, असा आरोप 'शिक्षक भारती' संघटनेने केला आहे.

शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिक्षण विभागाच्या या आडमुठ्या धोरणामुळे हजारो शिक्षकांचे शालार्थ, अनुकंपा व इतर महत्त्वाचे प्रस्ताव कार्यालयातील आवक–जावक विभागातून टेबलपर्यंत पोहोचतच नाहीत. मंत्रालयाकडून आलेली महत्त्वाची पत्रेही टेबलवर जाण्यास विलंब होत असल्याने कर्मचाऱ्यांचे नुकसान होत आहे.

### कायदेशीर अधिकारांवर गदा

महाराष्ट्र खासगी शाळा (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, कर्मचाऱ्याला आपल्या अर्जाची पोहच मिळण्याचा अधिकार आहे. मात्र, प्रशासनाकडून पोहच देण्यास टाळाटाळ केली जात आहे. आम्ही पत्र व्यवहाराच्या नियमांचे पालन करतो, मात्र प्रशासनाने आमच्या कायदेशीर अधिकारांचाही आदर केला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका महेश पाडेकर यांनी मांडली आहे.

जर शिक्षण उपसंचालक कार्यालयाने तातडीने हार्ड कॉपी स्वीकारून पोहच देण्याची व्यवस्था न केल्यास, राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल.

तसेच, या कारभाराबाबत उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही देण्यात आला आहे. शिक्षण विभागातील या 'टेबल–टू–टेबल' होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आणि दिरंगाईच्या चौकशीची मागणीही जोर धरू लागली आहे.

आता या दडपशाहीवर शिक्षण उपसंचालक काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण शिक्षक वर्गाचे लक्ष लागले आहे.

या मागणीसाठी विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रूपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, दीपक फापाळे, समन्वयक शरद पवार, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, प्रवीण मालुंजकर, साई थोरात, संपत वाळके, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, दिगंबर देसाई, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, गणपत धुमाळ, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला आहे.



कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी आमदार रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोळी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

# कोळी समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## जात वैधता प्रमाणपत्रासाठी तातडीने परिपत्रक काढण्याची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

नगर – कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी आमदार रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोळी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी समाजबांधवांनी निदर्शने करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

अनुसूचित जमातीतील कोळी समाजाच्या बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने मिळावे, तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत तातडीने परिपत्रक काढण्यात यावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत अनुसूचित जमातीतील नागरिकांना जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने परिपत्रक जारी करणे अपेक्षित होते. मात्र, विधानसभा, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लागू झालेल्या आचारसंहितेमुळे या प्रक्रियेला विलंब झाला असल्याची खंत कोळी समाजाने व्यक्त केली.

गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असून शासनाच्या दिरंगाईमुळे समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून संबंधित परिपत्रक त्वरित जारी करण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे करण्यात आली.

यावेळी कोळी महासंघाच्या वतीने संदीप मोरे, बंडा मोरे, जयंत होळकर, सुनील पवार, पोपट मोरे, कानिफ मोरे, उद्धव मोरे, मिथुन मोरे, लक्ष्मण मोरे, पंडा मोरे, शामराव मोरे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

प्रमुख मागण्या– अनुसूचित जमातीतील कोळी समाजाच्या नागरिकांना जातीचे दाखले सुलभ पद्धतीने मिळावेत तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सोपी करावी व २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करावी व संबंधित परिपत्रक त्वरित जारी करण्यासाठी शासनाने आवश्यक कार्यवाही करावी व प्रलंबित प्रश्नांवर मुख्यमंत्री स्तरावर तातडीने निर्णय घ्यावा.

# दक्षिण आफ्रिकेतील 'कॉम्रेड मॅरेथॉन'मध्ये नगरच्या ४ धावपटूंची उल्लेखनीय कामगिरी



दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये अहिल्यानगरच्या धावपटूंनी उल्लेखनीय कामगिरी करत तिरंगा फडकावला.

नगर – दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या जगप्रसिद्ध कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेत अहिल्यानगरच्या चार धावपटूंनी यशस्वी कामगिरी करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. जगातील सर्वात खडतर अल्ट्रा मॅरेथॉनपैकी एक मानली जाणारी ही ८५.७७ किलोमीटरची स्पर्धा डरबन ते पीटरमारित्झबर्ग या दोन शहरांदरम्यान पार पडली.

पहिल्या महायुद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या या स्पर्धेचे यंदाचे ९९ वे वर्ष होते. जगभरातील सुमारे २२ हजार धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. भारतातून २५० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला होता, त्यापैकी अहिल्यानगरचे चार धावपटू विशेष ठरले.

डॉ. अमित बडवे यांनी ९ तास ५८ मिनिटांत, जस्मित वधवा यांनी १० तास ०७ मिनिटांत, सुनील बनकर यांनी ११ तास १० मिनिटांत तर सचिन राणे यांनी ११ तास ५३ मिनिटांत ही खडतर स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली. या यशामागे धावपटूंची वर्षभराची मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि त्यांचे प्रशिक्षक संदीप जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच SPJ Sports Club, Ahilyanagar च्या सदस्यांचे प्रोत्साहन, सहकार्य आणि पाठबळही या यशात महत्त्वाचे ठरले.



'जिंदगी प्यार का गीत है' कार्यक्रमात लकी ड्रॉ सोडतील अशोक पराते यांना पैठणी साडीचे विजेते ठरले.

# 'जिंदगी प्यार का गीत हैं' च्या 'लकी ड्रॉ'त अशोक पराते यांना पैठणी साडीचे बक्षीस

## हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्याचा सन्मान

नगर – असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) आणि श्री पूजा इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'जिंदगी प्यार का गीत है' या बहारदार ऑर्केस्ट्रा म्युझिकल धमाल कार्यक्रमाला रसिकांनी प्रतिसाद दिला. संगीत, मनोरंजन आणि विविध आकर्षक उपक्रमांनी सजलेल्या या कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या लकी ड्रॉ सोडतीने विशेष रंगत आणली.

कार्यक्रमादरम्यान काढण्यात आलेल्या लकी ड्रॉमध्ये हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य अशोक पराते हे भाग्यवान विजेते ठरले. सोडतीद्वारे त्यांना आकर्षक पैठणी साडीचे बक्षीस प्रदान करण्यात आले.

सत्कार प्रसंगी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, ताराचंद ठोकळ, संजय भिंगारदिवे, जालिंदर अळकुटे, अविनाश जाधव, नवनाथ वेताळ, शिवांग शिंदे, ज्योतीताई भिंगारदिवे उपस्थित होते.

'जिंदगी प्यार का गीत है' या संगीत मैफलीने जुन्या–नव्या गाण्यांचा सुरेल संगम घडवत रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमातील कलाकारांच्या दमदार सादरीकरणामुळे उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटला. त्यातच लकी ड्रॉच्या उपक्रमामुळे कार्यक्रमात रंगत आनली.

# बँकॉक येथे भारतीय पॉवरलिफ्टिंगपटूंचे सुवर्णमय कामगिरी

## देवदत्त गुंडू यांची पाच सुवर्णपदकांवर मोहोर



देवदत्त गुंडू यांनी स्पर्धेतील संपूर्ण पॉवरलिफ्टिंगच्या पाच प्रकारांमध्ये सुवर्णपदकांची कमाई केली.

नगर – थायलंडमधील बँकॉक येथे १३ व १४ जून रोजी पार पडलेल्या डब्ल्यूआरपीएफ आयर्न वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२६ या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी करत देशाचा तिरंगा अभिमानाने फडकावला. या स्पर्धेत ११५ किलो वजन गटातील senior विभागात सहभागी झालेल्या देवदत्त प्रवीण गुंडू यांनी अप्रतिम ताकद, चिकाटी आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तब्बल पाच सुवर्णपदके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.

देवदत्त गुंडू यांनी स्पर्धेतील संपूर्ण पॉवरलिफ्टिंग प्रकार– SBD, push pull, only Deadlift, only bench press, only squats प्रकार अशा पाचही प्रकारांमध्ये प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवत सुवर्णपदकांची कमाई केली.

देवदत्त गुंडू हे अनेक वर्षांपासून पॉवरलिफ्टिंग खेळामध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. यापूर्वी रशिया येथे झालेल्या डब्ल्यूआरपीएफ जागतिक पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत त्यांनी रौप्यपदक पटकावून भारताला मान मिळवून दिला होता. तसेच व्हिएतनाम येथे झालेल्या डब्ल्यूआरपीएफ आशियाई पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत एक सुवर्ण आणि एक कांस्यपदक जिंकून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. राष्ट्रीय स्तरावरील विविध अजिंक्यपद स्पर्धांमध्येही त्यांनी अनेक सुवर्णपदके, चषक आणि मानचिन्हे प्राप्त केली आहेत.

देवदत्त गुंडू यांच्या यशामागे कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि खेळाप्रती असलेली निष्ठा हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांनी स्वतः उत्कृष्ट खेळाडू म्हणून नाव कमावतानाच अनेक खेळाडूंना प्रशिक्षण देऊन त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्याचे कार्यही केले आहे.

त्यांचे शिष्य किशोर यशवंत शिंदे यांनीदेखील या स्पर्धेत कामगिरी करत ९० किलो वजन गटातील मास्टर–१ विभागात सुवर्णपदक पटकावले. जागतिक स्पर्धेतील हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि प्रशिक्षक देवदत्त गुंडू यांच्या प्रभावी मार्गदर्शनाचे फलित मानले जात आहे. किशोर शिंदे यांनी यापूर्वी रशिया येथे झालेल्या जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. तसेच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतही त्यांनी सुवर्णपदक प्राप्त करून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या दोन्ही खेळाडूंच्या यशामुळे भारतीय पॉवरलिफ्टिंग क्षेत्राला नवी प्रेरणा मिळाली असून, महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचा झेंडा अभिमानाने फडकविणाऱ्या या खेळाडूंनी युवा पिढीसमोर आदर्श निर्माण केला आहे.

या यशाबद्दल देवदत्त गुंडू यांनी वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टिंग फेडरेशन, भारतचे प्रमुख सुनील लोचभ, राज्यप्रमुख सौरभ चौधरी, शितल चौधरी यांचे आभार मानले.

जागतिक स्पर्धेत मिळविलेल्या या ऐतिहासिक यशामुळे देवदत्त गुंडू आणि किशोर शिंदे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या या सुवर्णमय कामगिरीने भारतीय powerlifting क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांच्या यशामुळे अनेक युवकांना खेळाकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळणार असून भविष्यातही ते देशासाठी अशीच गौरवशाली कामगिरी करतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# 'शिवम टीव्हीएस' तर्फे ५५ इलेक्ट्रिक गाड्यांच्या महा–डिव्हिलरीसह अत्याधुनिक 'iQube S15' चे लाँचिंग

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक करण कराळे व संचालक आप्पासाहेब होले यांच्या हस्ते ग्राहकांना चाव्यांचे वाटप; प्रत्येक गाडीसोबत 'वृक्ष भेट' देऊन 'ग्रीन सिटी'चा ऐतिहासिक संकल्प

नगर – प्रदूषणमुक्त प्रवास आणि इंधनाची शंभर टक्के बचत करणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांकडे अहिल्यानगरकरांचा ओढा किती मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, याची प्रचिती झोपडी कॅन्टीन येथील 'शिवम टीव्हीएस' शोरूम मध्ये आली. "TVS iQube' आणि "TVS Orbiter' या इलेक्ट्रिक स्कूटर्सचा ऐतिहासिक 'महा डिलिव्हरी सोहळा' उत्साहात पार पडला. या सोहळ्यात एकाच वेळी तब्बल ५५ इलेक्ट्रिक गाड्यांचे वितरण करून शिवम टीव्हीएसने संपूर्ण जिल्ह्यात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

या महा–सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण ठरले ते म्हणजे टीव्हीएस कंपनीची बहुप्रतिक्षित आणि अत्याधुनिक 'TVS iQube S15 4.7KWH' या नवीन इलेक्ट्रिक स्कूटरचे अनावरण उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक करण कराळे, शिवम टीव्हीएसचे संचालक आप्पासाहेब होले, स्वप्नील होले व आकाश होले यांच्या उपस्थितीत आणि हस्ते नवीन स्कूटरचे लाँचिंग करण्यात आले.

याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून बोलताना ॲड. धनंजय जाधव यांनी शिवम टीव्हीएसच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले, आम्ही प्रशासन आणि नागरिकांच्या सहभागाने अहिल्यानगर शहराला 'ग्रीन सिटी' (हरित शहर) बनवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहोत. नेमका हाच सामाजिक धागा पकडून शिवम टीव्हीएस शोरूमने अत्यंत आदर्श पाऊल उचलले आहे. आजपासून गाडी खरेदी करणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला एक वृक्ष (झाड) भेट देऊन त्यांनी शहराला प्रदूषणमुक्त आणि हिरवेगार बनवण्याच्या मोहिमेत मोलाची भागीदारी केली आहे.

यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले नगरसेवक करण कराळे यांनी शोरूम व्यवस्थापन आणि नवीन ग्राहकांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, इलेक्ट्रिक वाहने ही आता काळाची गरज बनली आहेत. शिवम टीव्हीएसने अहिल्यानगरमधील नागरिकांना सर्वोत्कृष्ट ईव्ही तंत्रज्ञान आणि उत्तम सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिली आहे. एकाच दिवशी ५५ गाड्यांची डिलिव्हरी होणे आणि नवीन TVS IQube S15 4.7 मॉडेलचे लाँचिंग होणे, हा ग्राहकांनी शोरूमवर ठेवलेल्या अढळ विश्वासाचा जिवंत पुरावा आहे.



'शिवम टीव्हीएस' तर्फे ५५ इलेक्ट्रिक गाड्यांच्या महा–डिव्हिलरीसह अत्याधुनिक "TVS iQube S15' चे लाँचिंग करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक व शिवम टीव्हीएसचे संचालक आप्पासाहेब होले यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात ग्राहकांचे आभार मानले. ते म्हणाले, अहिल्यानगरच्या जनतेने शिवम टीव्हीएस परिवारावर ३३ वर्षा पासून जो दृढ विश्वास दाखवला आहे, त्याच बळावर आम्ही आज हा सुवर्णक्षण अनुभवत आहोत. ग्राहकांना केवळ गाडी विकणे हा आमचा उद्देश नसून, खरेदीनंतरही त्यांना अव्वल दर्जाची सर्व्हिस देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. आज एकाच दिवशी ५५ इलेक्ट्रिक गाड्यांची डिलिव्हरी करताना आम्हाला सार्थ अभिमान वाटत आहे. व्यावसायिक यशासोबतच सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून आम्ही प्रत्येक वाहनासोबत एक झाड देत आहोत, जेणेकरून आपले शहर अधिक देखणे, स्वच्छ आणि आरोग्यदायी होईल

कार्यक्रमादरम्यान सर्व ५५ नवीन वाहनधारकांचा स्टेजवर जाहीर सत्कार करण्यात आला. शोरूममध्ये आलेल्या इतर नागरिकांसाठी 'ईव्ही जागरूकता आणि टेस्ट राईड'चे विशेष आयोजन करण्यात आले होते, ज्याला नागरिकांनी प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी या ऐतिहासिक क्षणाची आठवण म्हणून एक सामूहिक छायाचित्र काढण्यात आले आणि उपस्थितांसाठी रुचकर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवम टीव्हीएसच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. विशेषतः जनरल मॅनेजर आकाश शिंदे, ईव्ही सेल्स मॅनेजर शकील शेख, तसेच सेल्स एक्झिक्युटिव्ह रोहित मोरे, दत्ता मिसाळ आणि पूजा मॅडम यांनी कार्यक्रमाचे नियोजन, ग्राहक समन्वय, वाहन वितरण व्यवस्था, ईव्ही जागरूकता उपक्रम आणि संपूर्ण सोहळ्याच्या व्यवस्थापनासाठी अथक मेहनत घेतली.

